जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/ ६१६० /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- ११/०५/२०२४

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन घेवुन न जाणेबाबत.**

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.४३७/६/१/ECI/PN/23/2024 DATE 16.03.2024 अन्वये १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला असुन दिनांक १६/०३/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहीता अस्तित्वात राहील. **३४ पुणे व ३६ शिरुर** लोकसभा मतदार संघात मतदान दिनांक १३/०५/२०२४ रोजी होणार आहे.

**पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात** ३४ पुणे लोकसभा मतदार संघात २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २१२ पर्वती, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ विधानसभा मतदार संघाचा तसेच ३६ शिरुर लोकसभा मतदार संघात १९८ शिरुर व २१३ हडपसर विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या नियमावलीप्रमाणे मतदानाच्या दिवशी मतदार हे मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन घेवुन न जाणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, मतदान केंद्राच्या परिसरात प्रचार होवु नये तसेच कायदा व सुव्यस्था अबाधित राखणेसाठी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन घेवुन जाणेस प्रतिबंध करणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ साठी **पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मतदान केंद्रावर दि. १३/०५/२०२४ रोजी ००.०१ वा.** पासून २४.०० वा पर्यत खालील आदेश देण्यात येत आहे.

- **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन घेवुन जाण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.**
- **मतदान केंद्रात अथवा १०० मीटर परिसरात कोणत्याही प्रकारे फोटोग्राफी/ व्हिडीओग्राफी करण्यास मनाई करण्यात येत आहे.**
- **मतदान केंद्र व मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचा ज्वलनशील पदार्थ, प्रतिबंधक वस्तु, आदर्श निवडणूक आचारसंहितेमध्ये नमुद केलेल्या नियमातील तरतुदीनुसार प्रतिबंधित बाबी घेवून जाण्यास मनाई करणेत येत आहे.**
- उपरोक्त आदेश उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी व मतदार यांना लागु राहील.

CamScanner

- उपरोक्त आदेश मतदानासाठी नियुक्त केलेले शासकीय अधिकारी/ स्टाफ /पोलीस यांना लागू राहणार नाहीत.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील. सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि. १७/०५/२०२४ रोजी दिला आहे.

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर
17/05/24

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :-१७/०५/२०२४

**प्रत सविनय सादर :-**

१.मा.अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, म.रा. मुंबई
२.मा.पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई
३.मा.आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
४.मा.पोलीस आयुक्त व अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर

**प्रत :- सस्नेह अग्रेषीत :-**

१. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग
२. मा.आयुक्त महानगरपालिका,पुणे
३. मा.जिल्हा सत्र न्यायाधीश, पुणे
४. मा.जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी पुणे
५. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी (पुणे व शिरुर)

**प्रत :-**

१. अपर पोलीस आयुक्त, प्रशासन /गुन्हे /पुर्व व पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर
२. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १,२,३,४ व ५ पुणे शहर
३. सहाय्यक पोलीस आयुक्त, व वाहतुक शाखा पुणे शहर
४. विधी अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
५. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे. २/- या आदेशाची स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी करावी.
६. व्यवस्थापक येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. २/- या आदेशास प्रसिध्दी देण्याकरीता आणि कार्यालयाच्या भांडारामध्ये ठेवण्यासाठी प्रती पाठविण्यात आल्या आहेत.
७. पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व वाहतुक शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक यांनी आपआपल्या हद्दीमध्ये या आदेशाची जास्तीत जास्त प्रसिध्दी होण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रसिध्दी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा.

CamScanner